अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांच्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१, सांगली व कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी या विभागाकडील उपविभागीय कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील १८१ पदांना व रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील २० पदांना दिनांक ०१/०१/२०१८ ते दिनांक २८/०२/२०१८ या कालावधीकरीता मुदतवाढ..

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: मुदतवाढ -०३१७/प्र.क्र.१९६/२०१७/मो.प्र.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०१ फेब्रुवारी, २०१८

वाचा:-१) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक:मुदतवाढ-०३१७/प्र.क्र.१९६/ २०१७/मो.प्र.१, दिनांक : ११/१०/२०१७.
२) अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांचे जा.क्र.सांपामं/आ-५/६८२४/ २०१७, दिनांक १५.१२.२०१७ चे पत्र.

शासन निर्णय :

अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांच्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१, सांगली व कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी अंतर्गत बांधकाम प्रकारातील दोन उपविभागातील, नियत अस्थायी आस्थापनेवरील अनुक्रमे १८१ पदांना व रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील २० पदांना दिनांक ०१/०१/२०१८ ते दिनांक २८/०२/२०१८ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांवर होणारा खर्च "मागणी क्रमांक आय-५ (नियत अस्थायी आस्थापना)- ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका, (०४) योजनेत्तर, (०४)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (४७०१ आय १६२)" व रूपांतरित अस्थायी आस्थापनेवरील पदांवर होणारा खर्च "मागणी क्रमांक आय-५ (रुपांतरीत अस्थायी आस्थापना)- ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (०२) योजनांतर्गत (०२)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (४७०१ एच ६२९)" या लेखाशिर्षाखाली महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार त्यांचेकडील उपलब्ध निधीतून भागविण्यांत येईल.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सदर आदेश शा.नि., वि. वि. क्र.पदनि-२०१६/ प्र.क्र.०८/ आ.पु.क., दिनांक ०८/०१/२०१८ अन्वये प्रशासकिय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकरानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०२०११६३११०९२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijendra
Prabhakar
Palwankar

Digitally signed by Vijendra Prabhakar Palwankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7cb5ce90d018bdc109ad48f37ca4a3b06b03473 75607bff9b7cc525c4c213e75, serialNumber=1525bd95a04e2d242eaa74f8dbc215ca88 aa7bfb907686a9a62b37f3a74e5eba, cn=Vijendra Prabhakar Palwankar
Date: 2018.02.01 16:36:05 +05'30'

(वि. प्र. पालवणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-सहपत्रासह,

१) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
४) मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, पुणे.
५) अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली.
६) कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्रमांक १, सांगली.
७) कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी.
८) अर्थ-१, कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) आ (प्रशि), कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) कार्यासन मो.प्र.१, संग्रहार्थ.